महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई


एलफिन्स्टन तंत्र शिक्षण विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

Email : jdhemumbai@gmail.com फोन व फॅक्स क्र. ०२२-२२६५६६००


जा.क्र. ससं/उशि/मुंवि/महाडीबीटी/२०२३-२४/ 4104 दिनांक : 17-10-23

**परिपत्रक**

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित,विना अनुदानित,
कायम विनाअनुदानित महाविद्यालये, मुंबई विभाग.

२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

४. कुलसचिव, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, मुंबई.

५. कुलसचिव, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई.

६. कुलसचिव, एच.एस.एन.सी.युनिव्हर्सिटी, मुंबई.

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि.०२.०८.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७
३. शासन निर्णय क्र.GAD-मातंस-२०१८/C.R.१३८/S.१/३९, दि.१२.१०.२०१८
४.संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२३-२४/डीबीटी दि.१२.१०.२०२३

राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात येत आहे. सन २०२३-२४ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि.११.१०.२०२३ पासून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे-

| अ. क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| ०१ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| ०२ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ०३ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ०४ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ०५ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ०६ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ०७ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ०८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ०९ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता |
| १० | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्यशासनाची अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे, तसेच महाविद्यालयातील लिपिक, प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**विद्यार्थ्यांसाठी सुचना :-**

१. उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी https://mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

३. उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

४. विद्यार्थी डीबीटी पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरु शकतात. तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्यांनी निवडलेल्या Perference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Perference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.

५. विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदवितांना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तीच्या अटीनुसार (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

७. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

८. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावा.

९. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

**महाविद्यालयांसाठी सुचना :-**

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेला शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी प्रथम संबंधित महाविद्यालयाच्या लिपिक लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.

२. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, देय लाभ आदि बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन महाविद्यालयातील लिपिकांनी विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करावी.

३. शिष्यवृत्तीनिहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/विनाअनुदानित) अभ्यासक्रमाचा कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details), टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.)

**४. महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve/Reject/Sent Back) करणे आवश्यक आहे.**

**५.** महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर (Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर उपलब्ध होतात.

**६. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकाप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve/Reject/Sent Back) करणे आवश्यक आहे.**

**७. तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रासहीत कागदपत्रासहीत जतन करुन ठेवण्यात यावी.**

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांनी नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी. तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अर्ज करणेसाठी आवश्यक ती मदत करावी. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत महाविद्यालयात कॅम्प आयोजित करण्यात यावेत तसेच आधार लिंकबाबतही जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून कॅम्प आयोजित करण्यात यावेत. झालेल्या कार्यशाळा, बैठका आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त या कार्यालयास सादर करावेत.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

सोबत- सर्व योजनांची माहिती